# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

म वि नि आ

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई – ४०० ००५.
दूरध्वनी ०२२–२२१६ ३९६४ / २२१६ ३९६५ / २२१६ ३९६९; फॅक्स (०२२) २२१६ ३९७६.
ई–मेल : mercindia@mercindia.org.in ● संकेतस्थळ : www.mercindia.org.in


## जाहीर नोटीस

जाहिरात क्र. ३/२०१२-१३

## महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगात ग्राहक प्रतिनिधी नियुक्त करण्यासाठी अर्ज

**विद्युत ग्राहकांची बाजू आयोगासमोरील कामकाजामध्ये मांडण्यासाठी संस्थात्मक आणि व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधी यांची महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी) विनियम, २०१२ अंतर्गत निवड करणे आणि त्यांना प्राधिकृत करणे याकरिता अर्ज मागविण्याबाबत.**

महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (प्राधिकृत ग्राहक प्रतिनिधी) विनियम २०१२ हे दिनांक ८ जून २०१२ रोजी अधिसूचित केले असून या विनियमांमध्ये, इतर बाबींबरोबरच, संस्थात्मक आणि व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधींच्या निवडीसाठी निकष, सदर ग्राहक प्रतिनिधींना प्राधिकृत करण्याची प्रक्रिया आणि संपूर्ण महाराष्ट्र राज्यातील ग्राहकांची बाजू मांडण्यासाठी या ग्राहक प्रतिनिधींनी करावयाच्या कार्यासंबंधी विविध शर्ती, घालून देण्यात आल्या आहेत. हे विनियम अधिसूचित होण्याच्या दिनांकापूर्वी, या विनियमांतील विनियम ८.५ नुसार, खालील ग्राहक संघटना, आयोगासमोरील कामकाजात ग्राहकांची बाजू मांडत होत्या. या विनियमांतील विनियम ८ मधील तरतुदींच्या अधीन राहून, या ग्राहक संघटना, खालील क्षेत्राकरिता, सदर विनियमांनुसार, मानीव संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधी म्हणून राहतील :-

| अनु. क्र. | क्षेत्र | संघटनेचे नाव |
|---|---|---|
| १ | मुंबई | मुंबई ग्राहक पंचायत |
| २ | कोकण विभाग | ठाणे बेलापूर इंडस्ट्रीज असोसिएशन |
| ३ | विदर्भ विभाग | विदर्भ इंडस्ट्रीज असोसिएशन |
| ४ | पश्चिम महाराष्ट्र विभाग | प्रयास (एनर्जी ग्रुप) |

उपरोल्लेखित विनियमांमधील ५.१ ला अनुसरून, महाराष्ट्र राज्याच्या उर्वरित दोन विभागातून म्हणजेच उत्तर विभाग आणि मराठवाडा विभागातील विद्युत ग्राहकांची बाजू मांडण्यासाठी स्वारस्य असलेल्या इच्छुक संस्थांकडून, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, अर्ज मागवित आहे. तसेच, विनियम ७.२ मध्ये नमूद केल्याप्रमाणे, पंधरा व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधींची यादी तयार करण्याकरिता, संपूर्ण महाराष्ट्रातील इच्छुक व्यक्तींकडून संबंध महाराष्ट्रातील विद्युत ग्राहकांची बाजू मांडण्याकरिता अर्ज मागविण्यात येत आहेत. इच्छुक संस्थात्मक ग्राहक प्रतिनिधी वरील विनियमांच्या परिशिष्ट-ब नुसार त्यांची माहिती पाठवतील. इच्छुक व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधी वरील विनियमांच्या परिशिष्ट-क नुसार त्यांची माहिती पाठवतील. इच्छुक संस्था व व्यक्ती, अर्ज करताना त्यांना लागू असलेल्या संबंधित विनियम ४.१ आणि विनियम ४.२ मधील पात्रता निकषांची पूर्तता करील असतील, याची खात्री करतील.

इच्छुक संस्थात्मक व व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधींनी, त्यांना संस्थात्मक किंवा व्यक्तिगत ग्राहक प्रतिनिधी म्हणून प्राधिकृत करण्यासाठीच्या अर्जाचा विहित नमुना, आयोगाच्या **www.mercindia.org.in** या संकेतस्थळावरून उतरवून घ्यावा आणि आपला अर्ज खालील पत्त्यावर १४ ऑगस्ट २०१२ रोजी किंवा त्यापूर्वी पाठवावा :-

सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, जागतिक व्यापार केंद्र, केंद्र क्र. १, १३ वा मजला, कफ परेड, मुंबई-४०० ००५.

आयोगाच्या आदेशानुसार,
स्वाक्षरी/-
सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

ठिकाण : मुंबई
दिनांक : ०६.०७.२०१२